प्रकरण पाचवे

# ‘महात्मा’ मधील वातावरणनिर्मिती

## प्रकरण पाचवे :

# ' महात्मा ' मधील वातावरणनिर्मिती

### ५.१ प्रास्ताविक :

मागील तिसऱ्या प्रकरणात आपण ' महात्मा ' ह्या कादंबरीतील व्यक्तिरेखांचा विचार केला. आता ह्या चौथ्या प्रकरणात आपण ' महात्मा ' मधील वातावरणनिर्मितीचा विचार करणार आहोत वातावरणनिर्मिती हा घटक कादंबरीच्या दृष्टीने एक महत्त्वाचा असा घटक आहे. कादंबरीतील कथानक वातावरणाच्या पार्श्वभूमीवर रेखाटलेले असते. वातावरण म्हणजे स्थळकाळाच्या वैशिष्ट्यांचे प्रतिबिंब होय. कादंबरी कुठलीही असाली तरी तिला एक प्रकारचे वातावरण हे असतेच. विविध घटनाप्रसंगांच्या माध्यमातून कथानकातील व्यक्तींच्या स्वभावावर प्रकाश पडत असतो. कादंबरीची गरज लक्षात घेऊन कादंबरीकारास वातावरणनिर्मिती करावी लागते. कादंबरी जर ऐतिहासिक असेल, तर वातावरण सुध्दा ऐतिहासिक स्वरूपाचे असते. वातावरणनिर्मिती होत असताना व्यक्तिरेखांच्या स्वभावाचेही वर्णन येत असते. चरित्रात्मक कादंबरीत चरित्रनायकाचे चरित्र आपल्यासमोर येत असताना त्याच्या एकूण गतकालीन जीवनाची पार्श्वभूमीही आपल्यासमोर येत असते. कादंबरीची वातावरणनिर्मिती स्थल व काल ह्यांच्या वर्णनाद्वारे केली जाते. वातावरणनिर्मिती हा कादंबरीतील स्वतंत्र असा घटक असल्यामुळे तो कादंबरीच्या यशस्वीतेच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. वातावरणनिर्मितीद्वारे कादंबरीमध्ये अधिकाधिक वास्तवता आणता येते. " चित्रकलेमध्ये पार्श्वभूमीला जे महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे, तसेच स्थान कादंबरीत वातावरणालाही मिळालेले आहे. कादंबरीत योग्य ते वातावरण निर्माण करण्यात जर ग्रंथकारास यश लाभले, तर कथानकातील विविध प्रसंग-घटना यामधील

कार्यकारणभावाची संगती सहज प्रकट होऊन व्यक्तिदर्शनाचे खरे मर्मही वाचकास सुलभ रीतीने प्रतीत होते," असे जे बापट-गोडबोले म्हणतात, ते योग्यच आहे.[१]

## ५.२ 'महात्मा' मधील वातावरणनिर्मिती :

'महात्मा' ही कादंबरी सत्य घटनांवर आधारित आहे. ती ज्या काळात घडते, त्या काळातील सामाजिक वातावरण गढुळ झालेले होते. सोवळे-ओवळे, अर्थशून्य कर्मकांड, अस्पृश्यता, जातिभेद, स्त्रीपुरुष विषमता व अन्य गोष्टींमुळे गढुळपणा तत्कालीन सामाजिक वातावरणात आलेला होता. ह्या सर्व गोष्टींविरूध्द बंड उभे करणारे महात्मा फुले हे आधुनिक भारतातील पहिले पुरूष होते. समग्र मानवसमाजाच्या समतेचा पुरस्कार त्यांनी केला होता. हे सर्व करीत असताना त्यांना त्यांच्या कार्यास अनुकूल किंवा प्रतिकूल असे वातावरण होते का, ते कशा स्वरूपाचे होते, म्हणजेच तत्कालीन सामाजिक, राजकीय, भौगोलिक व कौटुंबिक वातावरण कशा स्वरूपाचे होते, ह्याचा आपणास थोडक्यात विचार करावयाचा आहे.

'महात्मा' ह्या कादंबरीतील वातावरणाचा अभ्यास करण्यासाठी आपल्याला एकूण चरित्र कहाणीचाच विचार करावा लागतो. कादंबरीतील एकूण सामाजिक, राजकीय,भौगोलिक व कौटुंबिक अशा स्वरूपाचे वातावरण आपण क्रमाक्रमाने पाहणार आहोत.

## ५.३ कौटुंबिक वातावरण :

'महात्मा' ही कादंबरी म्हणजे म. जोतिराव फुले ह्यांची जीवनकहाणी आहे. त्यामुळे ही कहाणी त्यांच्या जीवनात घडलेल्या अनेक प्रसंगांमधून उलगडत जाते. त्यांचे समाजसुधारणा विषयक कार्य चालू असताना कौटुंबिक पातळीवर त्यांचा संघर्ष चालू होता

की काय, हे पाहणेसुध्दा महत्त्वाचे ठरते. म्हणून कादंबरीकाराला कादंबरी लिहीत असताना कौटुंबिक पार्श्वभूमीचा विचार करावा लागतो.

म. फुले ऊर्फ तात्या हे समाजसुधारक असल्यामुळे त्यांना आपल्या कार्याच्या प्रसंगी प्रथम घरातील लोकांना तोंड द्यावे लागले. दादा, आऊ, सावित्रीबाई ह्यांच्याशी झालेल्या चर्चेच्या वर्णनांमधून ह्यावर अधिक प्रकाश पडतो. तात्यांचे कौटुंबिक जीवन कशा प्रकारचे होते, ते समाजिक कार्यकर्ते असल्यामुळे त्यांना कुटुंबातीलच लोकांनी कसे अडथळे निर्माण केले किंवा कसा आधार दिला, ह्याचे बोलके वर्णन कादंबरीकाराने केलेले आहे. तात्या आपल्या मित्राच्या लग्नाला गेल्यानंतर त्यांचा अपमान झाला व ते घरी आले. त्यांचे लक्ष कशातच लागत नव्हते. तात्यांना असे आऊने कधीच पाहिले नव्हते. त्यामुळे आऊची झालेली अवस्था व सावित्रीबाईंना लागलेला घोर कादंबरीकाराने पुढीलप्रमाणे शब्दबध्द केला आहे. “ सगुणाआऊ आणि सावित्रीबाई उंबऱ्यात येऊन थांबल्या होत्या. सगुणाआऊच्या वृध्द चेहऱ्यावर काळजीचं जाळं पसरलं होतं. सावित्रीच्या शांत सोज्वळ मुद्रेवर भीती, उत्सुकता जाणवत होती. जोतीचं हे रूप तिला नवं होतं. रात्र-रात्र अभ्यास करीत बसणारा, वेळोवेळी तिला आणि आऊला काहीबाही वाचून दाखवणारा जोती आज तिला आणखी काही वेगळाच वाटत होता. काळीज फोडून येणारा त्याचा एकेक शब्द ती मनात साठवत होती ”[२]

ह्या अपमानातूनच जोतीचा पुढे जोतिराव झाला. आऊ तात्यांना चांगले ओळखत होती. तिला सतत त्यांची काळजी वाटत होती. त्यांच्याबद्दल ती सतत विचार करीत होती. त्यांच्याबद्दल ती खूप उच्च ध्येय ठेवून होती. म्हणूनच ती दादांना तात्यांना शिकविण्यास सांगते. सावित्रीबाईही लहान वयातच सर्व जाणून होत्या. तात्यांच्या प्रत्येक हालचालीवर त्या लक्ष ठेवून होत्या व चिंता करीत होत्या. अशा ह्या दोघींच्या

विचारसरणीतून व मन:पटलातून तात्यांची त्यावेळी झालेली मानसिक स्थिती कादंबरीकाराने आपल्यासमोर ठेवलेली आहे. त्यावेळी निर्माण झालेले कौटुंबिक वातावरणही आपल्यासमोर ठेवलेले आहे. सावित्रीबाईंचा होत असलेला वैचारिक कोंडमारा, दिवसभर कष्ट करून शरिराला जाणवणारा थकवा, तरीही तात्या जेवल्याशिवाय पाण्यालाही स्पर्श न करणाऱ्या सावित्रीबाई व आऊ आणि ह्या दोघींच्या अवस्थेची जाणीव असणारे तात्या असे फुले कुटुंबाचे वर्णन कादंबरीकाराने पुढीलप्रमाणे केलेले आहे. " बरीच रात्र झाली असावी. आऊ आणि सावित्री तशाच बसून होत्या. दिवसभर शेतात राबणारी आऊ अजून जेवली नव्हती. मोठ्या जाऊबाईबरोबर ढोरागुरांची उस्तवार आणि घरकाम यात थकून जाणारी सावित्री जोती जेवल्याखेरीज पाण्यालाही स्पर्श करीत नसे.

जोतीच्या मनात कणव दाटून आला. आपल्यासाठी आऊ आणि सावित्री अजूनही थांबल्या आहेत. आपण जेवलो नाही, तर त्याही जेवणार नाहीत, ही जाणीव होताच तो उठला.

"आऊ, जेवायला वाढ," जोती म्हणाला.

भांड्यांची खुडबूड सुरू झाली. सावित्रीनं तांब्या भरून दिला.

हातपाय धूऊन जोती पाटावर बसला."[३]

तात्यांनी जेव्हा सामाजिक कार्यास स्वत:ला वाहून घेतले, तत्कालीन प्रस्थापित समाजाविरूध्द जाऊन आपल्या कार्यास प्रारंभ केला; तेव्हा त्यांच्या भाऊबंदांनी त्यांना कसा विरोध केला, त्यावेळी दादांची मन:स्थिती कशी झाली, त्याचे वर्णन कादंबरीकाराने पुढीलप्रमाणे केले आहे :

" रोज दिवेलागण होण्याच्या आत घरी परतणारे दादा गेले बरेच दिवस झाकड पडली, तरी मळ्यातच थांबत. दिवसाउजेडी घराकडं येताना वाटेत कुणीतरी भेटायचं,

काहीबाही विचारायचं. विचारणारा माणूस पोराच्या आणि सुनेच्या वागण्यापायी आपल्याला हसतोय, असंच त्यांना वाटायच. दोन-चारदा असं झाल्यावर अंधार पडल्याशिवाय ते घराकडं परतत नसत. बाकीची कामं राजाराम सांभाळून घेई. त्याच्या मदतीला गडीमाणसं होतीच.

दिवेलागण झाली. गल्लीबोळांतून अंधार दाटला, तेव्हा कुठं दादा अंगणात दिसले. सावित्रीनं त्यांना पाणी दिलं. हातपाय धुऊन दादा विसावले. जोती त्यांच्याजवळ जाऊन बसला. त्याला पाहताच दादांनी तोंड फिरवलं. ''[४]

' जोती शिकून वर सावित्रीलाही शिकवतोय, ऐकत तर काहीच नाही,' ह्याचा दादांच्या मनावर आघात झाला होता व त्यामुळेच लोक आपल्याला काहीबाही बोलत आहेत, असे त्यांना वाटत होते. भाऊबंदकीतल्या लोकांनी घरी येऊन दादांना आडवे लावले होते. ह्याचे वर्णन कादंबरीकाराने पुढीलप्रमाणे केले आहे : '' बैठकीच्या खोलीत भाऊबंदांची बैठक सुरू होती. राणोजी, त्यांचा मुलगा बाबाजी, सटवाजी, खंडुजी अशी बरीच मंडळी जमली होती. यावेळी मळ्यात असणारा राजाराम आज घरीच होता. जो तो तावातावानं बोलत होता. दादा गपगुमान सारं ऐकून घेत होते.''[५] प्रत्यक्ष तात्यांना माहीत होते की, हे सारे लोक आपल्या स्वत:च्या मनाने आलेले नव्हते, तर त्यांना इतरांनी पाठविलेले होते. हे लोक स्वत:ही सुधारत नव्हते व इतरांनाही सुधारू देत नव्हते. अशा प्रकारे ह्या कादंबरीत कौटुंबिक वातावरण थोडेसे संघर्षाचे, पण जास्त प्रेमाचे, जिव्हाळ्याचे दिसून येते. ह्या वातावरणनिर्मितीमुळे व्यक्तिदर्शन ठसठशीत झालेले आहे. शिवाय वाचक हया सर्व प्रसंगांशी एकरूप होऊन जातो.

## ५.४ सामाजिक वातावरण :

' महात्मा ' ह्या कादंबरीत कादंबरीकार रवींद्र ठाकूर ह्यांनी तत्कालीन सामाजिक पार्श्वभूमीचे अनेक प्रसंग चित्रित करून सत्य स्वरूपात तत्कालीन सामाजिक वास्तव मांडले आहे. कादंबरीच्या अगदी सुरूवातीपासूनच सामाजिक जीवनाचे ज्ञान आपल्याला होते. कादंबरीत चित्रित झालेले सामाजिक जीवन हे तत्कालीन समाजाचा इतिहासच असतो. म्हणून सामाजिक पार्श्वभूमीला कोणत्याही कादंबरीत महत्त्वाचे स्थान असते.

' महात्मा ' ही कादंबरी म. जोतिबा फुले ह्यांच्या चरित्रावर आधारित असल्यामुळे त्यांचे चरित्र रेखाटत असताना तत्कालीन एकूण परिस्थितीचे येथे चित्रण येणे अपरिहार्यच आहे. त्यांचे कार्य हे पूर्णपणे सामाजिक स्वरूपाचे होते. हे कार्य करीत असताना त्यांना तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा कसा विचार करावा लागला, त्या परिस्थितीमुळे त्यांची मन:स्थिती कशी झाली, प्रतिकूल अशा सामाजिक वातावरणातही त्यांनी आपले कार्य कसे यशापर्यंत पोहोचविले, ह्या सर्व गोष्टींचे वर्णन कादंबरीकाराने ह्या कादंबरीतून केलेले आहे. असे काही घटना-प्रसंग असतात की, ज्यांच्यामुळे पूर्णच तत्कालीन सामाजिक वातावरण कसे होते, हे आपणास कळते. उदा. लग्नातील अपमानाचा प्रसंग शिवाय एकूणच सामाजिक वातावरण हे कर्मकांड, शूद्र, अतिशूद्र, शिवाशिव ह्या कल्पनांनी कसे गढुळ बनलेले होते व विधवांचे जीवन दयनीय कसे होते, तसेच स्त्रियांना शिक्षणापासून कसे दूर ठवले जात होते, ह्याचेही वर्णन ह्या घटना-प्रसंगांमधून येते.

शूद्र-अतिशूद्र माणसांना जनावरांपेक्षाही कसे हीन समजले जात होते, ह्याचे दर्शन आपल्यास होते ते तात्यांच्या मित्राच्या लग्नप्रसंगी त्यांचा जो अपमान झाला, त्या प्रसंगामधून. तो प्रसंग कादंबरीकाराने पुढीलप्रमाणे चित्रित केला आहे : " सदाशिव आणि मोरो यांनीही आज आपल्या ठेवणीतल्या पगड्या डोकीवर चढवल्या होत्या आजुबाजूच्या

लालपिवळ्या पगड्यांमध्ये जोतीचा तुरेदार तांबडा फेटा तेवढा वेगळेपणानं उठून दिसत होता. तिघे ब्राह्मण मंडळींत मिसळून चालत होते. त्यांच्या आगंमागं चालणाऱ्या दोघा-तिघा गृहस्थांनी मागं वळून पाहिलं आणि त्यांच्या कपाळावर एकदम आठ्या चढल्या. कोणी तो प्रकार पाहताच एकदम नापसंतीदर्शक मान हलवली. पुढे चालणाऱ्या आणखी दोघा गृहस्थांनी मागं वळून पाहिलं आणि त्यांच्या मस्तकावरची शीर तडकली. ते पुढं चालणाऱ्या दोघा-तिघा पगड्यांच्या कानाशी लागले. त्यासरशी दोन-चार पगड्या इकडून तिकडं गेल्या. पुन्हा-पुन्हा मागं वळून पाहू लागल्या. डोळे विस्फारले गेले. शूद्र कुणबटाचं एक पोरटं ब्राह्मण मंडळींत शिरलं होतं, ब्रह्मवृंदाच्या बरोबरीनं चालत होतं.''[६]

ज्या वरातीत नवऱ्या मुलासाठी घोडा आणला होता, तो एक पशू होता. त्याने वरातीत असलेले चालत होते. परंतु एका शूद्र मनुष्याने मात्र वरातीत असलेले सनातनी ब्राह्मणांना चालत नव्हते. ही तत्कालीन सामाजिक परिस्थिती होती, हे तत्कालीन सामाजिक वास्तव होते. त्यांना घोड्याचा विटाळ होत नव्हता. परंतु मनुष्याचा मात्र होत होता. स्वत: भूदेवाप्रमाणे वागणूक मागून घेणारे हे तथाकथित भूदेव मंदिरासारख्या पवित्र ठिकाणीसुध्दा माणसांची सावली पडून घेत नसत. कादंबरीकार लिहितो,

'' सूर्यास्तानंतरचा धूसर संधिप्रकाश सर्वत्र परसला होता. देवदेवेश्वराच्या मंदिरात घंटा घणघणत होत्या. दर्शनार्थी लगबगीनं मार्ग आक्रमत होते. सोवळं नेसलेल्या अर्ध्या उघड्या ब्राह्मणांचे तापे पर्वती चढत-उतरत होते. जाणाऱ्या येणाऱ्या ब्राह्मणांना पाहताच लोक चटकन् बाजूला सरकत होते. त्यांना आपला वारा लागू नये, म्हणून काळजी घेत होते. तशातही चुकून कोणी जवळून सरकला, तरी ब्राह्मण वसकन् अंगावर येत होते, शिव्याशाप देत होते, पंचपात्रीतल पाणी शिंपडत झरझर चालत होते.''[७]

आपल्यावर अन्याय होतो आहे, ह्याचीच जाणीव तात्यांना अजाणत्या, अज्ञानी, भोळ्या-भाबड्या जनतेला करून द्यावयाची होती. अतिशूद्रांच्या बाबतीत तर ह्याहून वाईट अनुभव येत होते. एक-एक अनुभव दादा आपल्या संतप्त झालेल्या मुलाला सांगताना म्हणतात,

" तरी आजचे दिवस बरे म्हणायचे. तुला काय सांगायचं, पेशवाईत तर बामणांची बरोबरी करायला जाणं हाच मोठा गुन्हा होता. त्याबद्दल लोकांनी काय-काय शिक्षा सोसल्या, त्या काय सांगायच्या ? कपाळावरचा गंध कसा लावयचा, धोतर कसं नेसायचं, याचे कायदे होते. आडवं धोतर आणि आडवा गंध लावायचा अधिकार बामणांचा. आपल्या घरामागं राहणारा तो शेनू सुतार त्याची गोष्ट तुला माहीत आहे ? तो आडवं धोतर नेसला, म्हणून पेशवे सरकारनं त्याचा कुल्ला कापला होता. सोनार लोकांनी आडवा गंध लावला, तर त्यांच्या कपाळावर लोखंड तापवून डाग दिले. न्हावी, तेली लोकांना सकाळी घराबाहेर पडणं कठीण हुतं. सकाळच्याला ते नुसते नदरंला पडले, तरी बामन लोक त्यांना बेदम मार द्यायचे. महारामांगांची गोष्ट तर विचारूच नको. तेलशेंदूर पाजून त्यांना सर्रास बांधकामाच्या पायात गाडलं जायाचं. ऊन डोक्यावर आल्याशिवाय त्यांना गावात येता यायचं नाही आणि आलं, तर गळ्यात गाडगं आणि कमरला फास बांधावा लागायचा. "[८]

ब्राह्मण लोकांनी कसेही आडवे वागले, तरी चालत होते. कारण ते नियम त्यांनी स्वत: निर्माण केलेले होते. परंतु इतरांनी मात्र सरळच नाकासमोर चालत राहायचे, हा त्यांना सामाजिक नियम घालून देण्यात आला होता. त्याविरूध्द कुणीही काहीही बोलत नव्हते. काही करण्यास गेले, तर मात्र स्वत:च्या प्राणाला ते मुकत होते. त्यांचा प्राण सनातनी ब्राह्मण घेत. तरीही त्यांना ते पाप वाटत नव्हते.

शूद्र-अतिशूद्रांना अशी वाईट वागणूक दिली जात होती त्यापेक्षाही वाईट वागणूक स्त्रियांना, विशेषत: विधवांना दिली जात होती. प्रथमत: मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवत. लहान वयात त्यांचं लग्न त्यांना आजोबा शोभेल, अशा वृध्द पुरुषांबरोबर लावत. वार्धक्याने हा नवरा मरण पावला की ऐन तारुण्यात ह्या मुली विधवा होत. ह्या विधवांना अनेक कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागे. कादंबरीकार लिहितो, " एक चालतं-बोलतं पातक, एक अशुभ म्हणूनच त्यांच्याकडं पाहिलं जात होतं. आई-बाप, बहीण-भाऊ, सासु-सासरे, अवतीभोवतीची सर्व माणसं त्यांचे वैरी होते. कोणालाही त्यांच्या जखमी मनावर फुंकर घालविशी वाटत नव्हती. उलट विधवेला छळलं नाही, तर देवाचा कोप होईल, असं त्यांना वाटे विधवेचं जगणं हे एक जिवंत मरण होतं. परंतु मानवतेच्या या भीषण विटंबनेचं कोणालाच काही वाटत नव्हतं. पेशवाईनं समाजाला दिलेली ही आणखी एक भयंकर देणगी होती. "[९]

ह्याच विधवा मग वासनांध पुरुषांच्या पापी नजरेच्या बळी ठरून गर्भवती होत. त्यातीलच एक होती काशिबाई जिला जन्मठेपेची शिक्षा झाली व दुसरीही काशिबाई होती जिचा मुलगा फुले दांपत्याने दत्तक घेतला. तात्यांचे मन विधवांना अन्यायकारक अशा ह्या सामाजिक वातावरणामुळे तडफडून उठत होते व त्यावर उपाय सुचवित होते. केशवपनासारखे प्रकार तर फार रूढ होते. एखादी निष्पाप स्त्री विधवा झाली की, लगेच केशवपन केले जाई. तिने केशवपन जर केले नाही, तर मग त्या स्त्रीच्या मृत्यूनंतर तिला अग्नी देण्यासदेखील कोण लोक येत नसत. तात्यांनी ह्या अन्यायाविरूध्द आवाज उठविला होता. मुलींना शिक्षण दिले. पुनर्विवाह घडवून आणले.

## ५.५ **भौगोलिक वातावरण :**

बापट - गोडबोले भौगोलिक वातावरणाचे महत्त्व पुढीलप्रमाणे विशद करतात : " भौगोलिक वातावरण निर्माण करणे, हे वातावरणनिर्मितीच्या तीन अंगांपैकी पहिले अंग

असून तिला आपण कादंबरीच्या अंतरिक्षाची पहिली पातळी असे म्हणू.''[१०] सामाजिक जीवनाचे चित्रण करीत असतानाच कादंबरीकाराला तेथील प्रादेशिक वातावरणाचा म्हणजेच भौगोलिक वातावरणाचा सतत कानोसा घ्यावा लागतो. त्या वातावरणावर आधारितच कादंबरीकाराला आपल्या कादंबरीतील घटनांची मांडणी करावी लागते. आपल्या कादंबरीला साजेल, असेच वातावरण त्याला निर्माण करावे लागते. बारकाईने भौगोलिक वर्णन करून तेथील वातावरण अधिकाधिक जिवंत करण्याचा प्रयत्न कादंबरीकार करीत असतो.

कादंबरीकार रवींद्र ठाकूर ह्यांनी ' महात्मा ' ह्या आपल्या कादंबरीमध्ये हे सर्व वर्णन नेमकेपणाने केले आहे. जणू ते दृश्यच आपल्या समोर घडते आहे, असा वाचकांना भास होतो. पावसाची वाट पाहणाऱ्या पिकांचे वर्णन कादंबरीत पुढीलप्रमाणे येते.

'' शेताशेतात उभी असलेली कोवळी रोपं पावसाची वाट पाहत ताटकळत होती. चढत्या उन्हात त्यांच्या माना मलूल होऊन खाली झुकल होत्या. आभाळात कुठंही पावसाचं चिन्ह दिसत नव्हतं.

झाडाचं पान हलू नये, अशा जड हवेत उष्मा कोंडला होता. अंगाची तलखी होत होती. अपुऱ्या पावसामुळं जमीन जणू उष्ण उसासे टाकत होती. पोटातली आग उष्ण वाफा होऊन बाहेर पडत होती.''[११]

निसर्गाची अवकृपा कशी व कुठे होते, ते कोणालाच सांगता येत नाही. कारण एकीकडे पाऊस नव्हता, तर त्याच वेळी दुसरीकडे पावसाने थैमान घातले होते. कसे ते पहा : '' इकडं महाराष्ट्रात पावसाची वाट पाहून डोळे फुटायची वेळ आली होती आणि तिकडं गुजरातेत मात्र वादळी पावसानं आणि अतिवृष्टीनं थैमान घातलं होतं.''[१२] अशा ह्या दुष्काळी वातावरणामुळे माणसांचे व जनावरांचे हाल पाहवत नव्हते. निसर्गापुढे कोणाचेच

काही चालत नव्हते. कादंबरीकार लिहितो, " दुष्काळापुढं भल्याभल्यांनी हात टेकले. त्याच्या तडाख्यातून फुलेवाडाही सुटला नाही. राजारामभाऊंनी बायकोपोरांसह मुंबई जवळ केली. दुष्काळ संपल्यावरच ते पुण्याला परतणार होते."[१३] दुष्काळाची भीषणता कादंबरीकार पुढीलप्रमाणे व्यक्त करतो : " गावोगावांकडून येणाऱ्या बातम्या ऐकवत नव्हत्या. माणसं अन्नपाण्यावाचून तडफडून मरत होती. काही ठिकाणी सरकारनं दुष्काळी कामं काढली. परंतु तेवढ्यानं काहीच फरक पडला नाही. महागाई आभाळाचं पोट फाडून वर सरकली होती. गुराढोरांचे हाल पाहवत नव्हते. सरकारनं गुराढोरांसाठी जंगलं खुली केली. परंतु जंगलातही चारा उरला नव्हता. चारापाण्यासाठी शेकडो मैल भटकत जाऊन गुरंढोरं कुठंतरी प्राण सोडत होती आणि त्यांची हाडंकाडं खाऊन माणसं आपला जीव जगवत होती."[१४]

दुष्काळात भर पडली ती प्लेगच्या साथीची. ह्या दुहेरी संकटामुळे जनजीवन कसे दु:खीकष्टी झाले, ह्याचे वर्णन कादंबरीकार पुढीलप्रमाणे करतो : " अचानक एके दिवशी मोठं वादळ झालं कुठं कुठं विजा चमकल्या आणि वळवाच्या पावसानं हैदोस मांडला.

वळीव आला, तसा निघून गेला आणि पुन्हा मागचे दिवस पुढे आले.

गुराढोरांच्या तोंडात पाण्याचा घोट सोडून वळीव निघून गेला. आता आशा होती ती फक्त रोहिण्याची. . . .मृगाची. . . . आणि त्यांना यायला अजून कितीतरी अवकाश होता, तोवर जीव जगवणं भाग होतं.

परंतु वळीव गेला आणि प्लेगची साथ पसरली. दुष्काळानं टेकीला आलेले लोक प्लेगनं जर्जर झाले, गावशीव सोडून रानोमाळ पळू लागले. अन्नावाचून अशक्त झालेली मुलं-माणसं प्लेगला बळी पडू लागली. लक्ष्मी, बाबू, शिवाजी ही मुलंही त्याच्या तावडीत सापडली. जीवघेण्या दुष्काळात उगवलेला हा प्लेग कोणकोणते घास घेईल, हे सांगणं कठीण झालं."[१५]

वळवाच्या पावसानंतरच्या स्थितीचे वर्णन पुढीलप्रमाणे येते : " वळवाच्या पावसानं झोडपून निघालेलं पुणे शहर रात्र पडली, तरी आतल्या आत गदगदत होतं. दुपारपासून थैमान घालणारा वारा निपचिप पडला होता. दोन घटकांपूर्वी अंगात वारं संचारल्यासारखी धुमणारी झाडं थकल्यासारखी धुगून बसली होती. मातकट वास भिजलेला कुबट उष्मा हवेत पसरला होता. वैशाखरात्रीच्या काळ्या आकाशात अजूनही कुठं-कुठं एखाददुसरा ढग तरंगत होता."[१६]

अशा प्रकारे निसर्गाचे हुबेहूब वर्णन करून त्या-त्या प्रसंगाला साजेसे असे वातावरण निर्माण करण्यात कादंबरीकार ठाकूर यशस्वी ठरले आहेत.

## ५.६ **राजकीय वातावरण** :

ह्या कादंबरीत कादंबरीकार ठाकूर ह्यांनी जास्त स्वरूपात राजकीय वातावरणाचा परामर्श घेतलेला नाही. कारण कादंबरीनायक म. फुले ह्यांना राजकीय सुधारणांपेक्षा सामाजिक सुधारणांमध्ये अधिक रस होता. त्यांना समाजक्रांती करावयाची होती. तुरळक प्रसंग मात्र राजकीय स्वरूपाचे आलेले आढळतात. पैकी एक प्रसंग असा : " आखाड्यात पुन्हा बंडाच्या मसलती शिजू लागल्या होत्या. अधून-मधून रात्री बंदीची तोफ उडाल्यावर बापू भांगरे, भाऊ खरे यांच्यासारखे बंडवाले आखाड्यात येत. त्यांच्या सोबत रघू भांगरे, नाना दरबारे, चिमणाजी जाधव यांच्यासारखे लढवय्ये असत. त्यांची आणि लहुजीबुवाची गुप्त खलबतं चालत. इंग्रजी सत्ता उलथवून पेशव्यांच्या नावानं राज्याचा ताबा घ्यायचा त्यांचा प्रयत्न असफल झाला, तरी त्यांच्या हालचाली अजूनही सुरू होत्या. पुरंदरचे रामोशी, सह्याद्री परिसरातले कोळी त्यांना येऊन मिळणार होते. उमाजी नायकाचा मुलगा बंडात उतरायला उत्सुक होता."[१७]

कोल्हापूरच्या छत्रपती शिवाजी महाराजांवर ओढवलेला प्रसंग, वासुदेव बळवंत फडके ह्यांच्या क्रांतीचा प्रसंग, भाऊ कोंडाजी पाटील ह्यांनी सर्व शेतकऱ्यांना एकत्र करून केलेल्या शेतकऱ्यांच्या बंडाचा प्रसंग हे सर्व राजकीय वातावरण/ पार्श्वभूमी लाभलेले प्रसंग आपणास ह्या कादंबरीत पहावायास मिळतात.

## ५.७ **समारोप** :

अशा प्रकारे ह्या कादंबरीत कादंबरीकार रवींद्र ठाकूर ह्यांनी स्थलकालाला अनुरूप अशीच वातावरणनिर्मिती केलेली आहे व ती वास्तव आहे, ह्याचा आपल्याला प्रत्यय येतो. ह्या सर्व वातावरणाचा अभ्यास करताना कादंबरीतील विविध व्यक्तींचे जीवनानुभवही प्रकट झालेले आपल्याला दिसून येते. रवींद्र ठाकूर ह्यांनी अशा स्वरूपाचे वातावरण निर्माण करून तत्कालीन जीवनच आपल्यासमोर साक्षात् उभे केले आहे. जीवनातील सत्यता पटवून सांगण्यासाठी त्या-त्या काळाशी एकनिष्ठ राहून रंजकता आणत-आणत, घटकाभराची करमणूक करीत करीत प्रसंगाशी खिळवून ठेवणारी वातावरणनिर्मिती त्यांनी केली आहे.

आता ह्या पुढील प्रकरणात आपण ‘ महात्मा ’ मधील भाषाशैलीचा विचार करणार आहोत.

# संदर्भ व टीपा :

१. बापट प्र. वा. व गोडबोले ना. वा., 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास ', व्हीनस प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती : सप्टें.१९७३, पृ.९

२. ठाकूर रवींद्र, ' महात्मा ' (चरित्रपर कादंबरी), मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती : ऑक्टो.१९९९, पृ. २२

३. तत्रैव, पृ. २३

४. तत्रैव, पृ. ४६

५. तत्रैव, पृ. ५०

६. तत्रैव, पृ. १८

७. तत्रैव, पृ. ३

८. तत्रैव, पृ. २१

९. तत्रैव, पृ. १४९

१०. बापट प्र. वा., व गोडबोले ना. वा., उनि., पृ. १३२

११. तत्रैव, पृ. २३५

१२. तत्रैव, पृ. २४१

१३. तत्रैव, पृ. २६३

१४. तत्रैव, पृ. २६३

१५. तत्रैव, पृ. २६४

१६. तत्रैव, पृ. २९०

१७. तत्रैव, पृ. २